**महाराष्ट्र शासन**

क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र. २६४ /विशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ४ ऑक्टोबर, २०११.

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,

विषयः- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवी विद्यार्थ्यांना अन्य पारंपारिक विद्यापीठांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश मिळत नसल्याबाबत.

महोदय,

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवी विद्यार्थ्यांना अन्य पारंपारिक विद्यापीठांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश मिळत नसल्याबाबत त्या विद्यापीठाच्या कुलगुरुंनी मा. कुलपतींना पत्र पाठविले आहे. त्या अनुषंगाने सदर विषय दिनांक १६.८.२०११ रोजी झालेल्या कुलगुरुंच्या संयुक्त बैठकीत चर्चेस घेण्यात आला होता. त्यात चर्चा झाल्यानुसार अन्य विद्यापीठांच्या कुलगुरुंनी याबाबतच्या परिस्थितीचा आढावा घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवींना मान्यता देऊन मुक्त विद्यापीठाच्या पदवी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यास परवानगी दयावी असे सूचविण्यात आले आहे. सदर परिस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येत आहे.

दुरस्थ शिक्षण परिषद व विद्यापीठ अनुदान आयोग यांचे निर्णय विचारात घेऊन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून राबविण्यात येणा-या विविध अभ्यासक्रमाच्या पदवी धारक विद्यार्थ्यांना त्यांच्या विद्यापीठामध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश देण्यास यापुढे नकार देण्यापूर्वी भारत सरकारच्या मनुष्य बळ विकास मंत्रालय, विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि दूरस्थ शिक्षण परिषद याव्दारे वेळोवेळी देण्यात येणा-या निर्देशांचा साकल्याने अभ्यास करुन मुक्त विद्यापीठाव्दारे पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या भावी उच्च शिक्षणाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायाची संधी विद्यार्थ्यांना द्यावी व त्यांच्या शैक्षणिक विकासात बाधा निर्माण होणार नाही याची गांभीर्याने दक्षता घेण्यात यावी

All schools / Dir / Secy / Cert / PA

आपला

(प्र. गि. कानडे)
कक्ष अधिकारी

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव अग्रेषित.

कुलसचिव कार्यालय
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
दि. २३/११/११



C:\vishi-3\letter\court matte-r letter.doc/